दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १९८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१८ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांची देशाचे पुढील सरन्यायाधीशपदी नियुक्ती

**नवीदिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रपतींनी न्यायमूर्ती धनंजय यशवंत चंद्रचूड यांची देशाचे पुढील सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. न्यायमूर्ती चंद्रचूड ९ नोव्हेंबरपासून पदभार स्वीकारणार असून ते देशाचे ५० वे सरन्यायाधीश असतील. त्यांचा कार्यकाळ १० नोव्हेंबर २०२४ पर्यंत असेल. न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड याची ८ नोव्हेंबर रोजी निवृत्त होणारे न्यायमूर्ती उदय लळीत यांच्या जागी नियुक्ती करण्यात आली आहे.



याबाबत माहिती देताना केंद्रीय कायदा मंत्री किरेन रिजिजू यांनी ट्वीट करत सांगितलं आहे की, भारतीय राज्यघटनेने दिलेल्या अधिकाराचा वापर करून, राष्ट्रपतींनी डॉ. न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांची ९ नोव्हेंबर २०२२ पासून भारताचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे.

# ‘मविआ’च्या एकीची ‘मशाल’ पेटणार

## ठाकरे, पवार भारत जोडो यात्रेत सहभागी होणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खा. शरद पवार आणि शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भारत जोडो यात्रेचे निमंत्रण स्वीकारले आहे. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी एच.के. पाटील, माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात आणि मुंबई विभागीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. भाई जगताप, काँग्रेसचे विधान परिषदेचे गटनेते आ. अमरनाथ राजूरकर यांनी आज एका शिष्टमंडळासह 'मातोश्री'वर उद्धव ठाकरे तर सिल्व्हर ओक येथे शरद पवार यांची भेट घेतली.



काँग्रेस नेते खा.राहुल गांधी यांनी सुरू केलेली 'भारत जोडो' यात्रा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात नांदेड जिल्ह्यातून महाराष्ट्रात प्रवेश करणार असून, आपणही या यात्रेत सहभागी व्हावे, असे निमंत्रण काँग्रेसच्या शिष्टमंडळाने उभय नेत्यांना दिले. दोहोंनीही हे निमंत्रण स्वीकारले असून, शरद पवार स्वतः तर शिवसेनेकडून उद्धव ठाकरे किंवा आदित्य ठाकरे यात्रेत सहभागी होणार असल्याचे शिष्टमंडळाला सांगण्यात आले.

भारत जोडो यात्रेला देशभरातील विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांचा पाठिंबा मिळत असून, दिवसेंदिवस प्रतिसाद वाढतोच आहे. महाराष्ट्रातही राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेने (ठाकरे गट) यात्रेत सहभाही होण्यास सहमती दिल्याने त्याचे महत्व अधिक वाढले आहे. खा. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांची भेट घेणाऱ्या शिष्टमंडळात माजी मंत्री नसीम खान, माजी मंत्री आ. विश्वजीत कदम, महाराष्ट्राचे सहप्रभारी बी.एम. संदीप, आ. सुधीर तांबे, आबा दळवी यांचा समावेश होता.

## अंधेरी पोटनिवडणूक : भाजपकडून उमेदवारी अर्ज मागे

### शिवसेना उमेदवार ऋतुजा लटके यांच्या विजयाचा मार्ग सुकर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

अंधेरी पोटनिवडणुकीसाठी शिवसेना आणि भाजप नेत्यांनी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर येथे चांगलेच ट्विस्ट पाहायला मिळाले. अखेर निवडणुकीतून अर्ज माघारी घेण्याच्या आजच्या शेवटच्यादिवशी भाजप उमेदवार मुरजी पटेल यांनी अर्ज माघारी घेतला. मनसेप्रमुख राज ठाकरेंनी केलेली विनंती, शरद पवारांचे आवाहन आणि प्रताप सरनाईक यांचे पत्र, यानंतर भाजप नेत्यांमध्ये तातडीच्या बैठका झाल्या आणि अखेर शिवसेना उमेदवार ऋतुजा लटके यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाला. त्यामुळे, आता अंधेरी पोटनिवडणुकीत भाजपचा उमेदवार नसणार आहे.



भाजपचे महाराष्ट्र प्रभारी सी.टी. रवि आणि मुंबईचे भाजप अध्यक्ष ॲड. आशिष शेलार यांच्यात बैठक झाली. या बैठकीनंतर भाजपने उमेदवारी मागे घेतल्याचा निर्णय जाहीर केला आहे. अंधेरी पोटनिवडणुकीत भाजपच्या उमेदवाराचा अर्ज परत घेत आहे. लटके या निवडून याव्या यासाठी अर्ज परत घेत आहोत, असे भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी सांगितले. दरम्यान, अंधेरी पोटनिवडणुकीसंदर्भात देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'मेघदूत' बंगल्यावर रविवारी रात्री उशिरा बैठक झाली. या बैठकीला आशिष शेलार आणि अंधेरी पूर्व पोटनिवडणुकीतील भाजप उमेदवार मुरजी पटेल उपस्थित होते. मुरजी पटेल हे निवडणूक लढवण्याच्या निर्णयावर ठाम होते. आपली पूर्ण तयारी झाल्याचं पटेल यांनी सांगितलं. तर आशिष शेलार यांचाही पोटनिवडणूक लढवण्याचा आग्रह होता. मात्र, अखेर सी. टी. राव यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर भाजपने उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय जाहीर केला. त्यामुळे, आता, ऋतुजा लटके यांचा विजय सोपा झाला आहे.

## खेरणे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भाजपचे शैलेश माळी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या २५ वर्षांहून अधिक काळ शेकापच्या ताब्यात असलेल्या खेरणे ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीत भारतीय जनता पार्टीने शेकापक्षाला पराभवाची धूळ चारली आहे. या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत थेट सरपंचपदी भाजपचे शैलेश बाळाराम माळी बहुमतांनी विजयी झाले आहेत.

पनवेल तालुक्यात रविवारी एकमेव खेरणे ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक पार पडली. आज(सोमवार, दि. १७) या ग्रामपंचायतीचा निकाल जाहीर झाला. गेल्या अनेक वर्षांपासून या ठिकाणी शेकापची सत्ता राहिली होती. हि सत्ता उलथवून टाकण्यासाठी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. शेकापने सत्तेचा वापर नेहमीच स्वतःच्या स्वार्थासाठी केले आहे. हे तेथील जनतेला कळून चुकले आहे, त्यामुळे मतदारांनी भाजपला कौल दिला. सरपंच पदी शैलेश माळी यांना विजयी केले.



तसेच रुपाली चंद्रकांत गोंधळी, राजेंद्र आत्माराम गोंधळी, अशोक गणपत गोंधळी, सुभद्रा संतू माळी, अक्षता सचिन पाटील हे भाजपचे उमेदवार विजयी झाले.

या सर्वांनी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, अरुणशेठ भगत यांची सदिच्छा भेट घेत जल्लोष केला. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत व इतर पदाधिकाऱ्यांनी विजयी उमेदवार तसेच कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. यावेळी तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य एकनाथ देशेकर, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, शिक्षक सेलचे जिल्हा संयोजक के. सी. पाटील, बुधाजी माळी, महेश पाटील, प्रकाश खैरे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## उरण बीपीसीईएल कंपनीच्या अन्याया विरोधात आमरण उपोषण



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील बीपीसीएल हा केंद्रशासनाचा राष्ट्रीय प्रकल्प भेंडखळ येथे कार्यरत असून येथील गावातील ग्रामस्थांनी आपल्या पिकत्या जमिनी कवडीमोल भावाने बीपीसीएल प्रकल्पाला दिल्या. शेतजमीनीच्या बदल्यात शेतकऱ्यांना नोकरी देण्याचे आश्वासनही कंपनी प्रशासनाने शेतकऱ्यांना दिले होते. मात्र भेंडखळ येथील स्थानिक रहिवाशी असलेले प्रकल्पग्रस्त अविनाश रमण ठाकूर यांची जमीन या प्रकल्पासाठी संपादित झाली असूनही या गोष्टीला जवळ जवळ ३० ते ३५ वर्षे झाले तरीही अविनाश रमण ठाकूर यांना नोकरित सामावून घेण्यात आलेले नाही.

मागील ३० ते ३५ वर्षे लोकशाही व कायदेशीर मार्गाने सर्वच शासकीय विभागात कार्यालयात पत्रव्यवहार करून सुद्धा न्याय मिळत नसल्याने प्रकल्पग्रस्त अविनाश रमण ठाकूर यांनी भेंडखळ येथील बीपीसीएल कंपनी गेट समोरच काल १७ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी ११ वाजल्या पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. शेतकऱ्याचे उदरनिर्वाहचे साधन असलेली शेती या बीपीसी एल कंपनीला दिली. आता उपजिविकेचे कोणतेच साधन उपलब्ध नसल्याने त्यांनी बीपीसीएल कंपनी प्रशासनाने नोकरीत सामावून घ्यावे अशी येथील ग्रामस्थांची मागणी आहे.

यासाठी भेंडखळ ग्रामस्थ मंडळाने या आमरण उपोषणाला जाहिर पाठींबा दिला आहे. भारतीय जनता पार्टीचे मिलींद पाटील, भारत मुक्ती मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष ज्ञानोबा सूर्यवंशी, बहुजन क्रांती मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष– मनोज रामधरणे, राष्ट्रीय मुलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे रायगड जिल्हाध्यक्ष – धर्मपाल जाधव, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष जंगबहादुर चौधरी, बहुजन मुक्ती पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष प्रविण पाटील, रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाचे उरण तालुका उपाध्यक्ष शिवाजी ठाकूर, छत्रपती क्रांती सेनाचे रायगड जिल्हाध्यक्ष–श्रेयश म्हसकर, वारकरी संप्रदायाचे प्रभाकर ठाकूर आदी विविध राजकीय पक्षाचे तसेच विविध सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष उपोषण स्थळी उपस्थित राहून अविनाश ठाकूर यांच्या आमरण उपोषणास जाहिर पाठींबा दिला आहे.

## कर्जत तालुक्यातील पोटल ग्रामपंचायतीत महाविकास आघाडीची बाजी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

जून २०२२ ते सप्टेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी काल दि.१६ ऑक्टोबर रोजी मतदान घेण्यात आले. त्या मध्ये ८७.०९ टक्के मतदान झाले आज दि.१७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी पार पडली त्यामध्ये पोटल ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट या आघाडीची सत्ता आली असून पाली तर्फे कोथल खलाटी ग्रामपंचायतीमध्ये ग्राम विकास आघाडीची बिनविरोध सत्ता आली.

पोटल ग्रामपंचायत मधील विजयी उमेदवार– थेट सरपंच पदाचे विजयी उमेदवार मीरा मसणे,सदस्य– ज्ञानेश्वर तुपे, कृष्णाजी जोशी, सुवर्णा मसणे, वर्षा मसणे, लतीफ कर्णेकर, इस्माईल मालदार, अश्विनी श्रीखंडे विजयी झाले आहेत. पाली तर्फे कोथल खलाटी ग्रामपंचायतीमध्ये बिनविरोध सदस्य– थेट सरपंच पदाचे बिनविरोध सरपंच संजना पवार, सदस्य– शिवानी कुंभार सुनीता देशमुख, सारिका वाघमारे, निर्मला देशमुख, हिराबाई जाधव, तुकाराम भोईर, राम वाघमारे बिनविरोध झाले आहेत.

## माणगांव तालुक्यातील ग्रामपंचायतींचा निकाल जाहीर

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगाव तालुक्यातील देगाव, पन्हळघर खुर्द, पन्हळघर बुद्रुक या ३ ग्रामपंचायतींमध्ये काल १६ ऑक्टोबर २०२२ रोजी निवडणूक पार पडली. त्यांचा आज १७ ऑक्टोबर ला निकाल जाहीर झाला आहे. जनतेतून थेट सरपंचाची निवड असल्यामुळे आणि राज्यात झालेल्या बंडखोरी आणि सत्ता परिवर्तनानंतर ही पहिलीच निवडणूक असल्यामुळे या निवडणुकीकडे सगळ्या तालुक्याचे लक्ष लागून होते.



देगाव ग्रामपंचायतमध्ये शेकापने विजय मिळविला असून शेतकरी कामगार पक्षाच्या वाघमारे सुषमा नितीन या देगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची निवडणूक विजयी झालेल्या आहेत. पन्हळघर खुर्द ग्रामपंचायती मध्ये शिवसेना ठाकरे गटाने विजय मिळविला असून शेडगे हरदास दौलत ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून विजयी झाले आहेत, पन्हळघर बुद्रुक ग्रामपंचायतीवर शिवसेना शिंदे गटाने विजय मिळविला आहे. वातेरे संतोष सिताराम येथे सरपंच म्हणून निवडून आले आहेत. अशा प्रकारे तीनपैकी शेकाप १, शिवसेना ठाकरे गट – १, शिवसेना शिंदे गट – १ असा निकाल माणगाव मध्ये लागला आहे.

## रायगड किल्ल्यावर सुरक्षा चौकीची पर्यायी व्यवस्था करावी : ना.मंगलप्रभात लोढा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

किल्ले रायगडावरील छत्रपती शिव–ाजी महाराजांच्या समाधीचे पावित्र्य जपण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. केंद्रीय पुरातत्व विभाग तसेच स्थानिक प्रशासनाने येथील सुरक्षा चौकीसाठी पर्यायी व्यवस्था करण्याचे निर्देश पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले.



यांसंदर्भात मंत्रालयातील दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी मंत्री लोढा बोलत होते. या बैठकीस सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभागाचे सचिव सौरभ विजय, प्रांताधिकारी राहुल मुंडके, उपअधीक्षक जगदीश काकडे, ट्रेकर आणि दुर्गप्रेमीचे राजेंद्र फडके, रायगड विकास प्राधिकरणाचे सदस्य रघुजी राजे आंग्रे, केंद्रीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे राजन दिवेकर व फाल्गुनी काटकर उपस्थित होते.

मंत्री श्री.लोढा म्हणाले, रायगड किल्ला परिसरात अस्वच्छतेबाबत तसेच सुरक्षा चौकीबाबत दुर्गप्रेमी आणि इतिहास संशोधकांकडून तक्रारी येत आहेत. हा परिसर आपल्या इतिहासाचा साक्षीदार आहे. त्याच्या जतन व संवर्धनामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. रायगड किल्ल्यावर परिसर स्वच्छता राखणे, या परिसरात उभारण्यात आलेल्या सुरक्षा चौकीसाठी पर्यायी जागा निवडण्याबाबत स्थानिक प्रशासनाने तत्काळ बैठक आयोजित करावी, असे निर्देश पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले.

## महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून घेऊन चोरटे पसार

**दै.रायगड नगरी । रोहा**

दुकानात असलेल्या महिलेकडे सिगारेट व लाईटरची मागणी केली असता सदर महिला त्या अनोळखी इसमाच्या हातात लाईटर देत असताना असताना अनोळखी चोरट्याने या महिलेच्या गळ्यातील किमंती मंगळसूत्र हिसाकून घेऊन सोबत असलेल्या अन्य एका साथीदाराच्या मोटारसायकलवर बसून घटनास्थाळावरून धूम ठोकली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

सदर घटना रोहा– धाटाव मार्गावरील वरसे येथील गजबजलेल्या ठिकाणी सकाळी ८ : ४५ वा. च्या सुमारास घटना घडली असून येथील फिर्यादी महिला ओमसाई

.../२

# मावळतीकडे चाललेला सूरय

ब्रिटनच्या पंतप्रधान लिझ ट्रस अवघ्या पाच आठवड्यांपूर्वी ‘१०, डाउनिंग स्ट्रीट’मध्ये गेल्या, तेव्हाही ब्रिटनची अर्थव्यवस्था कमालीची संकटात होती. महागाई प्रचंड वाढली होती. उणे विकास नोंदविला गेलाच होता. ब्रिटनमध्ये पैसे गुंतविलेल्या मोठ्या गुंतवणूकदारांचा विश्वास डळमळीत होत चालला होता. संकटाच्या अशा खाईत सापडलेला ब्रिटन हा पहिला युरोपीय देश नव्हता. त्या आधी इटलीची आर्थिक प्रकृती तोळामासा झालीच होती. ती अजून सावरलेली नाही. तिच्या जोडीला आता ब्रिटन जाऊन बसला आहे. सत्तेवर आल्यानंतर कंपनी कर आणि प्राप्तिकरासकट सर्व करांच्या दरात कपात करणारा ‘मध्यावधी अर्थसंकल्प’ मांडणे आणि साऱ्या जगभरातून, बड्या गुंतवणूकदारांकडून तीव्र प्रतिक्रिया आल्यानंतर तो मागे घेणे आणि अर्थमंत्र्यांचा बळी देणे, या वेगवान घडामोडींनी ट्रस सरकार संकटात सापडले आहे. अर्थमंत्री क्वासी कारतेंग यांचा राजीनामा घेऊन आणि आधी केलेली करकपात रद्द करून हे राजकीय संकट टळेल का, हे सांगता येत नाही. लिझ यांना आव्हान देणारे ऋषी सुनक पुन्हा स्पर्धेत येतात का आणि पंतप्रधान होतात का, हा प्रश्नही पुढचे काही दिवस चर्चेत राहणार आहे. मात्र, लिझ ट्रस सत्तेत राहिल्या काय किंवा त्यांच्या जागी दुसरे कोणी आले काय; ब्रिटनपुढचे आर्थिक संकट कसे दूर होणार, हा लाखमोलाचा प्रश्न आहे. करकपातीची तीव्र प्रतिक्रिया आल्यानंतर पंतप्रधानांनी ज्या वेगाने माघार घेतली ती ब्रिटिश सरकारच्या डळमळत्या आत्मविश्वासाची खूण आहे. तसेच, युरोपवरील अर्थसंकटात कोणताही नेमका किंवा सुयोग्य मार्ग सापडत नाहीय, हेही दिसते आहे. इटली आणि ब्रिटनमधील घडामोडी म्हणजे जागतिक महामंदीची चाहूल आहे का, याचेही उत्तर शोधावे लागणार आहे. युरोपमधील या घडमोडींकडे अमेरिका सचिंत मुद्रेने पाहत आहे. आज जागतिक बाजारात डॉलर मजबूत दिसत असला तरी प्रत्यक्षात अमेरिकेचीही अर्थव्यवस्था गोते खाते आहे. थोडक्यात, ब्रिटनची हलाखी हा इशारा समजून साऱ्या जगाने एकत्र येऊन पावले टाकायला हवीत. यात युक्रेन जिंकण्याच्या वेडाने पछाडलेले रशियाचे पुतिन आणि जग काबीज करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारे शी जिनपिंग हे दोन मोठे अडथळे आहेत. ब्रिटनची अर्थव्यवस्था करोनाकाळातच अडचणीत सापडू लागली. युक्रेन युद्धाने ही अवनतीची गती वाढवली. विजेचे दर कमालीचे वाढले. चलनवाढ म्हणजे महागाईने चार दशकांचा विक्रम मोडला. मुख्य म्हणजे, कॉर्पोरेट कामगिरीशी जोडल्या गेलेल्या सामाजिक सुरक्षा योजना संकटात सापडू लागल्या. पेन्शन फंड हे त्याचे लक्षणीय उदाहरण. देशातील ज्येष्ठ नागरिकांना मिळणारे निवृत्तिवेतन हे शेअर बाजारातील गुंतवणुकीशी पेन्शन फंडाद्वारे जोडून टाकणे, हे किती जोखमीचे आहे, हा धडा उदारीकरणाच्या घोड्यावर स्वार झालेल्या भारतानेही लक्षात घेण्यासारखा आहे. अर्थमंत्र्यांनी करकपात सुचवली तेव्हा सरकारच्या तिजोरीतील संभाव्य तुटीचे आकडे प्रकाशित झाले. सरकारच्या घटत्या अर्थशक्तीची ती खूण होती. करकपात केली तर उद्योगांना तसेच गुंतवणुकीला चालना मिळेल, असा ट्रस सरकारचा कयास होता. मात्र, या निर्णयामुळे चलनवाढ वाढणार आणि वाढत्या महागाईने सामान्य नागरिक अधिकच होरपळणार, असे हे कोडे आहे. तसे म्हटले तर उद्या कोणतेही सरकार ब्रिटनमध्ये सत्तेत आले तरी कोणाकडेही जादूची छडी असणार नाही. किंबहुना, कोणताही धडाडीचा वाटणारा किंवा क्रांतिकारक वाटणारा निर्णय घेतला गेला तरी ब्रिटन निश्चितपणे मंदीच्या जबड्यात शिरत आहे. ते थांबविणे जवळपास अशक्य आहे. ब्रिटनच्या निमित्ताने जगावरही महामंदी कोसळणार का, हा प्रश्न उभा आहे. लोकसंख्येच्या वाढीच्या वेगापेक्षा अर्थवाढीचा वेग कमी झाला तर जागतिक मंदी, असा एक ठोकताळा आहे. आजतरी अर्थतज्ज्ञ जगाचा विकासदर १.९ टक्के राहील, असे म्हणत आहेत. लोकसंख्यावाढीचा जागतिक दर सध्या १.१ टक्के आहे. मात्र, हा विकासदराचा अंदाज खाली येऊ शकतो. आज ब्रिटन, युरोप व अमेरिका महागाई, घटते जीवनमान आणि उद्योगांची उणे गती या तीन प्रमुख संकटांनी ग्रासले आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीलाही आज मंदी न येता जग तरून जाईल, याचा विश्वास आज वाटत नाही. भारत, तेलसमृद्ध आखाती देश आणि संकटे झेलत विकासाची वाट चालणारे आफ्रिकी देश हेच या मंदीचा सामना करण्यासाठी खरे आशेचे दिवे आहेत. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि इतरही वित्त संस्थांनी आता आपली अमेरिका आणि युरोपकेंद्री दृष्टी बदलून या देशांना वाढत्या मदतीचा हात द्यायला हवा. ब्रिटिशांच्या साम्राज्याचा सूर्य मागेच मावळला. तेच आता अर्थकारणात होत आहे. ब्रिटन आणि युरोपला या आपत्तीमधून वाचवायचे असेल तर भारतासहित आशिया खंडाला पुढे यावे लागेल. त्या दृष्टीने आपले केंद्र सरकार कोणते धोरण अवलंबते, हे आता पाहावे लागेल.

# खोपटा पूल मार्गावरील सततच्या वाहतूक कोंडीने प्रवाशी, विद्यार्थी हैराण

**दै.रायगड नगरी । उरण**





उरण पूर्व भागाला जोडणाऱ्या खोपटा पूलावर सतत अवजड वाहनांची वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे.त्यामुळे क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या कंटेनर ट्रेलरच्या वर्दळीमुळे खोपटा पुल पुर्णतः बेजार झाला आहे. तर वाहतूक कोंडीत अडकून पडलेले प्रवाशी नागरीक, विद्यार्थी पुरते हैराण झाले आहेत.अशा समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे. उरण तालुक्यात जेएनपीएच्या अनुषंगाने अनेक गोदामे उद्योग धंदे सुरू झाले आहेत.त्यातच उरणचा पूर्व विभागतही कंटेनर गोदामे यांची उभारणी झपाट्याने होत आहे.

त्यामध्ये बांधपाडा व कोप्रोली ग्रामपंचायत हद्दीत या अगोदर ट्रान्स इंडिया, कॉन्टिनेटल, अमेया लॉजीस्टिक, न्यू ट्रान्स इंडिया, विरगो, ग्लोबीकॉन, ऑल कार्गो, कॉरवान असे मुख्य आणि छोटी गोदामे एमटी यार्ड ही वसविले आहेत. या कंटेनर यार्ड मधून जेएनपीए बंदर तसेच इतर बंदरा-तून देश परदेशात आयात-निर्यात होणाऱ्या मालाची वाहतूक ही मोठ्या प्रमाणात खोपटा पुलावरून रात्री - अपरात्री होत आहे. अशा पुर्व विभागाला उरण शहरांशी जोडणाऱ्या खोपटा पुलाची उभारणी ही राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅ.ऐ.आर.अंतुले यांनी केली होती. या खोपटा येथील जुन्या पुलावरून प्रवाशी वाहनांबरोबर २० ते ३० टन क्षमतेच्या वाहनांची वर्दळ होऊ शकते. असे आवाहन उरण तहसिल व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सातत्याने करण्यात येत आहे.

परंतु त्याच खोपटा पुलावरून मोठ्या प्रमाणात ६० ते ८० टन क्षमतेच्या मालानी भरलेल्या कंटेनर ट्रेलरच्या वाहतूक ही प्रशासनाची डोळेझाक करून केली जात आहे. त्यामुळे अशा बेजबाबदार पणामुळे सातत्याने खोपटा पुलावर ६० ते ८० टन क्षमतेच्या अवजड वाहनांची संख्या बळावून वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. त्याचा त्रास हा खोपटा पुला बरोबर प्रवास करणाऱ्या विद्यार्थी व प्रवाशी नागरीकांना सहन करावा लागत आहे. तरी उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे. माल भरण्यासाठी ये- जा करणाऱ्या ट्रेलरला यार्ड मालकांनी पार्किंगची व्यवस्था उपलब्ध न केल्याने ट्रेलर चालक आपली अवजड वाहने खोपटा पुलावर तसेच रस्त्यावरच राजरोसपणे उभी ठेवत आहेत. त्यामुळे सिंगल रोड असलेल्या रस्त्यावरून जेमतेम दोन गाड्या मार्गक्रमण करतात. रस्ता अरुंद असल्याने वाहने जाण्या येण्यासाठी जागाच शिल्लक उरत नाही. त्यातच बेशिस्त वाहनचालकांमुळे तर आणखी वाहतूक कोंडी बरोबर अपघात होत आहेत. अशा उद्भवणाऱ्या वाहतूक कोंडीचा त्रास हा नाहक त्रास सर्वसामान्य जनतेला सहन करावा लागत आहे.त्यामुळे अशा वाहतूक कोंडीवर ठोस उपाययोजना संबंधित प्रशासनाने करावी अशी मागणी कोप्रोली येथील सामाजिक कार्यकर्ते मनोहर म्हात्रे यांनी केली आहे.

# पनवेलमध्ये तरुणाई साकारत आहे शिवनेरी किल्ला







**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जागवण्यासाठी पनवेलमध्ये तरुणाईने यंदाच्या वर्षी सुद्धा स्वराज्याची मुहूर्तमेढ ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांनी रोवली तो शिवनेरी किल्ला उभारण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. शहरातील काही तरुणांनी एकत्र येऊन कट्टा परिवार हि संकल्पना सुरु केली आहे. त्या अनुषंगाने ते यंदाही किल्ला उभारत आहेत.

शहारातील विरुपाक्ष मंदिरासमोरील पटवर्धन वाडा येथे मोकळ्या जागेत दररोज १६ ते २० तरुण-तरुणी आपले शिक्षण व उद्योगधंधा सांभाळीत सायंकाळी सदर ठिकाणी एकत्र येऊन हा किल्ला उभारण्याचे काम गेल्या २० दिवसांपासून करीत आहेत.

यासाठी ते स्वतःच्या खिशाला चाट देऊन ठराविक रक्कम जमा करून किल्ला उभारणीसाठी आपले योगदान देत आ-हेत. गेल्या ३ वर्षांपासून हि तरुणपिढी अश्याप्रकारे हे वेगवेगळे किल्ले उभारीत आहेत. पहिल्या वर्षी त्यांना आयोजित किल्ले स्पर्धेत तृतीय बक्षीस मिळाले होते. तर मागील वर्षी द्वितीय मिळाले होते. तर यंदा प्रथम क्रमांक पटकण्याचा मानस संस्थेचे अध्यक्ष प्रभंजन गाडगीळ यांनी व्यक्त केले आहे. त्याचप्रमाणे कट्टा परिवारातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य असे ८ बाय ६ फुटी असे पोट्रेट बनवणार असून सदर पोट्रेट किल्लयाच्या बाजूला ठेवण्यात येणार आहे त्यामुळे या किल्लयाची शोभा आणखी वाढणार असल्याची माहिती सदस्य अमिनेश पटवर्धन यांनी दिली.

# कामगारनेते जितेंद्र घरत यांच्या माध्यमातून दीपक नायट्रेडमधील कामगारांना पगारवाढीचा करार; दरमहा १३५०० रुपयांची पगारवाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**



तळोजा एमआयडीसी क्षेत्रातील दीपक नायट्रेड लिमिटेड मधील कामगारांना वेतनवाढ आणि सेवा सुविधांचा करार दीपक नायट्रेड एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष कामगारनेते जितेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. त्यानुसार कामगारांना प्रती महिना १३५०० रुपयांची पगारवाढ झाली आहे.

चार वर्षांसाठी झालेल्या करारानुसार पगारवाढीसोबत २० टक्के बोनस, तीन लाख रुपयांची मेडिक्लेम पॉलिसी, १५२०० सानुग्रह अनुदान व इतर सेवा कामगारांना देण्यात येणार आहेत. या करारावर स्वाक्षरी करताना युनियनचे अध्यक्ष जितेंद्र घरत, जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या कार्यालयीन सचिव समीरा चव्हाण, सचिव विनायक मुंबईकर, संघटक रवींद्र कोरडे, कंपनीतर्फे जनरल मॅनेजर राजेश पालकर, एम गणेसन, भरत सकपाले, साईट हेड अविनाश परांजपे, उपव्यवस्थापक हर्षल पाटील, कामगार प्रतिनिधी राजेंद्र तारेकर, सुरेश म्हात्रे, शिवराम म्हात्रे, प्रकाश एडगे, गणेश पाटील आदी उपस्थित होते.

# नांदगावमध्ये कचरा व्यवस्थापन जनजागृती

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

स्वच्छ गांव सुंदर गाव, एक पाऊल स्वच्छतेकडे गावाच्या उज्वल भवितव्यासाठी आरोग्यासाठी सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील चव्हाण यांनी उपक्रम हाती घेतला असून कचर्याची विल्हेवाट कशी लावावी.याबाबत मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील शंकर मंदिरात खास महिलांसाठी दिनांक १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० वा. (अपेक्षित महिला खारीक वाडा, कोळीवाडा, मोहल्ला माळीवाडा, गणपती मंदिर रीशर, कुंभारवाडा) आणि दिनांक १९ नोव्हेंबर रोजी भवानी पाखाडी (भवानी पाखाडी , नागेश्वर नगर, दांडा महिला ग्रामस्थ) सायंकाळी ठिक ५.३०वा. आयोजित केला आहे. हा कार्यक्रम महिलांसाठी असून जास्तीत जास्त लोकांपर्यंत आम्ही पोहोचू आणि कचर्याचा बिकट प्रश्न सोडवण्यासाठी काही सोपे उपाय शिकवू. सध्या गावात घंटा गाडी नाही आहे पण आपण स्वतः होणारा कचरा कमी करूया. एक पाउल स्वच्छ नांदगाव करण्यासाठी आणि गावच्या उज्वल भविष्यासाठी प्रयत्न करूया आणि कार्यक्रमात सहभागी होऊ या.असे स्वप्नील चव्हाण यांनी निमंत्रणाद्वारे कळविले आहे.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.परविंदर करम सिंह आणि श्री.करम सिंह, रा.ए-४०१, प्लॉट नं.३, अशोका रेसिडेन्सी, शिल्प चौक जवळ, सेक्टर १२, खारघर, नवी मुंई ४१०२१० यांनी खलील वर्णनाचे दुकान गाळ्याचे संदर्भात विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार मालक श्री.विजय हरिराम नरसिंघानी, राहणार हॅपी होम, प्लॉट नं.६११/६१७, कला पॅलेस जवळ, उल्हासनगर १, ठाणे यांचे सोबत ठरविला आहे.

**मिळकतीचे वर्णन :- दुकान/गाळा क्रं.१०, तळमजला, क्षेत्रफळ २४.५९ चौ.मी. बिल्टअप एरिया, मोनार्च लक्झरिया को.ऑप. हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं.६, सेक्टर नं.१८, खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६**

तरी कोणीही व्यक्ती/व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थांचे सदर मिळकती संदर्भात कुठल्याही प्रकारचा दावा, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी बक्षिस, भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत या मिळकतीच्या संबंधित कागद पत्रासोबत माझ्या कार्यालयीन पत्यावर संपर्क साधावा अन्यथा सदर मिळकतीच्या विक्री व हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती / तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

ठिकाण : खारघर
दि.१७/१०/२०२२

सही/-
**ॲड.यश प्रभाकर बांगर**
**शॉप नं.०४, समनवय को.ऑप.हौ.सो., प्लॉट क्र.१३, सेक्टर क्र.११, खारघर-४१०२१०**
**मो.नं.८९२८५५६४०१**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्री.तुषार सुधाकर बाचल आणि २) श्रीमती.अनिता तुषार बाचल, रा.ए-१८०२, अमर सेरेनिटी, वाकेश्वर चौक, सर्वे नं.१३८/५, पुणे पाषण, पुणे शहर-४११०२१ यांनी खालील वर्णनाच्या मिळकती संदर्भात विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार मालक श्रीमती.लक्ष्मी अबिचंदानी उर्फ लक्ष्मी धनानी, रा.बी-४०२, वैभव अपार्टमेंट जुना प्रभादेवी रोड, मुंबई ४०००२५, यांचेसोबत ठरविला आहे.

**मिळकतीचे वर्णन :- सदनिका क्रमांक-सी/९१०, नववा मजला, सी-विंग, इमारतीचे नाव : शाह अलपाईन, प्लॉट क्रमांक-६, सेक्टर-६, खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१०. क्षेत्रफळ-३३३ चौ.फूट कारपेट + ४७ चौ.फुट टेरेस.**

तरी कोणीही व्यक्ती/व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थांचे सदर मिळकती संदर्भात कुठल्याही प्रकारचा दावा, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी बक्षिस, भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत या मिळकतीच्या संबंधित कागद पत्रासोबत माझ्या कार्यालयीन पत्यावर संपर्क साधावा अन्यथा सदर मिळकतीच्या विक्री व हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती / तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

ठिकाण : खारघर
दि.१७/१०/२०२२

सही/-
**ॲड.यश प्रभाकर बांगर**
**शॉप नं.०४, समनवय को.ऑप.हौ.सो., प्लॉट क्र.१३, सेक्टर क्र.११, खारघर-४१०२१०**
**मो.नं.८९२८५५६४०१**

# अज्ञात वाहनाच्या ठोकरेने इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ गावाजवळ जेएनपीटी कडून पनवेल कडे जाणाऱ्या रोडवर एका अज्ञात वाहनाच्या धडकेने एका अनोळखी इसमाचा मृत्यू झाला आहे.

कुंडेवहाळ गावाजवळ कुलवाई माता मंदिर परिसरात जेएनपीटी कडून पनवेल कडे जाणाऱ्या रोडवर एका अज्ञात वाहनाच्या धडकेने एका अनोळखी इसमाचा ज्याचे अंदाजे वय ३०-३५ वर्षे आहे. त्याचा दुर्दैवी मुर्त्यू झाला आहे. या अपघातानंतर सदर वाहनचालक वाहनासह पसार झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# नाईक अंतुले महाविद्यालय म्हसळा येथे वाचन प्रेरणा दिन साजरा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा येथील कोकण उन्नती मित्र मंडळ संचलित वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅरिस्टर ए.आर.अंतुले विज्ञान महाविद्यालयात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती निमित्त ’वाचन प्रेरणा दिवस’म्हणून उत्साहाच्या वाता-वरणात ग्रंथालयात संपन्न झाला.

या कार्यक्रमास बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सर्व प्रथम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डी.ए.टेकळे यांनी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. त्याच बरोबर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. या प्रसंगी प्रा.डॉ.एस.यु.बेंद्रे यांनी डॉ.अब्दुल कलाम यांच्या विषयी विचार व्यक्त केले व त्यांच्या जीवना-तील महत्वाच्या घटना सुंदर पद्धतीने मांडल्या. महाविद्यालीयन प्रभारी प्राचार्य डी.ए.टेकळे यांनी विद्यार्थ्यांना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या ‘अग्निपंख’ या चरित्रातील अनेक महत्वपूर्ण घटना आजच्या युवा पिढीने कशा प्रकारे अनुसरण्याजोगे आहे हे सांगितले.तसेच डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्रातून विद्यार्थी, शिक्षक, नागरिक व एक संवेदनशील माणूस म्हणून किमान कोणत्या बाबी आपण ग्रहण कराव्यात याची मांडणी केली.प्रतिकूल परिस्थितीत कशी उभारी घ्यावी, यश संपादन करावे,ज्ञान हीच खरी शक्ती आहे जी मानवी जीवन चरित्र अधिक प्रगल्भ बनवू शकते असे सांगण्यात आले.विकसीत जीवनाची, विकसीत समाजाची स्वप्न कशी बघवीत, जगावीत व जागवावीत,सामाजिक बांधिलकी, संवेदनशीलता, राष्ट्रभक्ती कशी आत्मसात करावी याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे जीवन चरित्र म्हणून ओळख असे ग्रंथपाल प्रा.आर.एस.मशाळे यांच्या कडून सांगण्यात आले आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देखील करण्यात आले. सदर कार्यक्रमास डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना अभिवादन करण्यासाठी प्रा.जाधव, प्रा.समेळ, प्रा.डॉ.सिद्धिकी, प्रा.डॉ.बेंद्रे, प्रा.दुंडे, प्रा.उमासरे, प्रा.बढे, प्रा.हालोर, प्रा.शिगवण, प्रा.चव्हाण, प्राध्या.नजिरी, मुख्यलेखनिक मयूर करडे, श्रीम.समेळ, साळवे, वैभव कळस, बोरकर व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून घेऊन चोरटे पसार

इलेक्ट्रिकल हे दुकान उघडून बसलेल्या असताना एक अनोळखी इसमाने महिलेकडे सिगारेट लाईटरची मागणी केली. फिर्यादी महिला त्या अनोळखी इसमाच्या हातात लाईटर देत असताना या ठिकाणी दुसरे कोणीही नाही याचा गैर फायदा घेऊन फिर्यादी महिलेच्या गळ्यातील १लाख १० रुपये किंमतीचा मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून घेतले. दुकाना जवळ रस्त्यावर थांबून असलेल्या मोटारसायकलस्वारच्या मागे बसून ते दोन अज्ञात चोरटे घटनास्थळावरून पळून गेले. या घटनेची सर्व हकीकत महिलेने पोलिसांना सांगताच पोलिसांनी अनोळखी दोन चोरटयांविरोधात मंगळसूत्र चोरीचा गुन्हा दाखल केला असून या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली उप निरीक्षक विनोद वायंगणकर करीत आहे. दरम्यान या घटनेमुळे महिला वर्गात घबराटीचे वातावरण पसरले आहे.

## म्हसळा नगर पंचायत, म्हसळा

**जाहीर नोटीस**

**जा.क्र.म्हनपं/जाहीर नोटीस/ १८०१ / २०२२ दिनांक :- १७/१०/२०२२**

महाराष्ट्र नगर परिषदा, म्हसळा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने म्हसळा नगरपंचायतीस प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकांच्याप्रकरणपरत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत हितसंबधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह म्हसळा नगर पंचायतीकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा कर वसुलीच्या सोईसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपंचायत दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्रं | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक / मालमत्ता क्रमाक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ७८० पैकी | दिघीरोड | घनसार कॉम्प्लेक्स आर. सी. सी. पद्धतीत इमारत पहिला मजला फ्लॅट नं. ०३ | नसीम अब्दुल बारी खान | नूह रियाझ अनसारी |
| २ | २ | ९५२ पैकी | कुंभार आळी | आर. सी. सी. पद्धतीत G + 2 ची इमारत दुसरा मजला फ्लॅट नं. २०४ | शांताराम आत्माराम बोरकर | योगेश गोपाळ पवार |
| ३ | २ | ६ पैकी | नवानगर | कमर्शियल आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला गाळा नं. १ | महमद शरीफ महमद हसन हळदे | नवीद हिदायतुल्ला हवालदार |
| ४ | २ | १९३६ पैकी | दिघीरोड | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत दुसरा मजला फ्लॅट नं. २०४ | रुक्साना शारीक इनामदार | एजाज अब्दुल अझीझ धनसे<br>फातिमा एजाज धनसे |
| ५ | ३ | ९९१ | उमर फारूक मोहल्ला | कौलारू सिमेंट रेतीत बांधलेले घर | यास्मीन फैय्याज उंड्रे<br>मुबीन हसन उंड्रे<br>रशीदा हसन उंड्रे<br>मदिना मुखतार सैन | मुखतार हसन उंड्रे<br>सुहेल हसन उंड्रे<br>सैफ हसन उंड्रे |
| ६ | ३ | ५३८ अ पैकी | म्हसळा बाजारपेठ परिसर | कौलारू सिमेंट रेतीत बांधलेले घर | अ.हकीम इब्राहीम उकये तर्फे<br>अ.शकुर अब्दुल रहिमान उकये | महेरनिगार अब्दुल शकुर उकये<br>सलमान अब्दुल शकुर उकये<br>मुजस्सम अब्दुल शकुर उकये<br>समीना फैय्याज अर्झबेगी<br>शीरीन मुर्तुजा पल्लवकर<br>शबनम तन्वीर संबुलखानी<br>फातिमा जहूर दाऊद |
| ७ | ३ | ११२५, १२५० ब, १४७६, १८८४ | श्रीवर्धन गोरेगाव रोड व नवानगर | आर. सी. सी. पद्धतीत कमर्शियल सिमेंट पत्रे सिमेंट रेतीत बांधलेले, कमर्शियल आर.सी.सी पद्धतीत बांधलेले | शब्बीर अ.अजीज बशारत | अब्दुल अझीझ शब्बीर बशारत<br>इम्रान शब्बीर बशारत<br>सुफीयान शब्बीर बशारत<br>अनसार शब्बीर बशारत<br>रजिया शब्बीर बशारत |

सही/- XXX
मुख्याधिकारी
म्हसळा नगरपंचायत

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# सोलर रुफटॉप योजना ग्राहकांच्या फायद्याची

**दै.रायगड नगरी । भांडूप**

महावितरणच्या छतावरील (रुफटॉप) सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून ४० टक्क्यांपर्यंत अनुदान मिळत आहे. सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणेमुळे मासिक घरगुती वीजबिलात मोठी बचत होऊन, नेटमिटरिंगद्वारे महावितरणकडून वर्षाअखेर शिल्लक वीज देखील विकत घेतली जाते. ग्राहकांच्या सोयीसाठी केंद्र शासनाने 'नेशनल पोर्टल फॉर सोलर रुफटॉप' चे अनावरण जुलै २०२२ मध्ये करण्यात आले.या पोर्टलवर ग्राहक भारतामधून कुठूनही सोलर रुफटॉपसाठी अर्ज करू शकतो.



पर्यावरण संरक्षणचे महत्व लक्षात घेऊन विविध राज्य आपल्या परीने अनेक उपाय अंमलात आणत आहेत. महावितरणने सुद्धा या मोहिमेत आपला हातभार लावण्यासाठी सौर रुफटॉप योजनेची घोषणा केली. सदर योजना ग्राहकांसाठी फायद्याची असून, रोहित्रावरचा ताण ही कमी होतो. या योजनेला जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहचवण्यासाठी प्रत्येक मंडळ, विभागीय, उपविभागीय कार्यालय तसेच एजन्सी प्रयत्न करत आहेत. महावितरणमध्ये,

या योजनेची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी संचालक (प्रकल्प) श्री.प्रसाद रेशमे स्वतः सर्व परिमंडलातील मुख्य अभियंत्याशी पाठपुरावा करित आहेत.

या योजनेमधून घरगुती वर्गवारीतील ग्राहकांना किमान एक किलोवॅट क्षमतेची छतावरील (रुफटॉप) सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून वित्त सहाय्य देण्यात येणार आहे. रुफटॉप सौर योजनेमधून घरगुती ग्राहकांसाठी अटी व शर्तीसह १ ते ३ किलोवॅटपर्यंत ४० टक्के आणि ३ किलोवॅटपेक्षा अधिक ते १० किलोवॅटपर्यंत २० टक्के अनुदान देण्यात येते. तसेच सामुहिक वापरासाठी ५०० किलोवॅटपर्यंत परंतु प्रत्येक घरासाठी १० किलोवॅट मर्यादेसह गृहनिर्माण रहिवासी संस्था (Group Housing Society) व निवासी कल्याणकारी संघटना (Residential Welfare Association) ग्राहकांना २० टक्के अनुदान मिळणार आहे.

महावितरण रुफटॉप सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा आस्थापित करण्यासाठी ऑनलाईन अर्जाची सोय महावितरणच्या www.mahadiscom.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. पाच वर्षांच्या देखभाल खर्चासह रुफटॉप सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणेसाठी जीएसटी वगळून १ किलोवॅट ते ३ किलोवॅट– ४१,४०० , ३ ते १० किलोवॅट– ३९,६०० तसेच १० ते १०० किलोवॅटसाठी ३७,००० रुपये प्रति किलोवॅट किंमत आहे.

उदा. या दराप्रमाणे ३ किलोवॅट क्षमतेसाठी सौर ऊर्जा यंत्रणेची १ लाख २४ हजार १४० रुपये किंमत राहील. त्यामध्ये ४० टक्के अनुदानाप्रमाणे ४९ हजार ६५६ रुपयांचे केंद्रीय वित्त सहाय्य मिळेल व संबंधीत ग्राहकास प्रत्यक्षात ७४ हजार ४८४ रुपयांचा खर्च करावा लागेल. याशिवाय, नेशनल पोर्टल फॉर सोलर रुफटॉप' चे या पोर्टलवर ग्राहक भारतामधून कुठूनही सोलर रुफटॉपसाठी अर्ज करू शकतो. नेशनल पोर्टलवर ग्राहकांनी अर्ज केल्यास त्यांना महावितरणच्या पोर्टलवर सुद्धा अर्ज करण्यासाठी महावितरणकडून एसएमएस पाठविण्यात येते. ग्राहकांनी 'अप्लायेड एट नेशनल पोर्टल' वर क्लिक करून आपला अर्ज भरू शकतो.

रुफटॉप सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा कार्यान्वित केल्यानंतर दरमहा १०० युनिटपर्यंत वापर असलेल्या घरगुती ग्राहकांकडील एक किलोवॅट क्षमतेच्या सौर यंत्रणेमधून वीजबिलामध्ये सध्याच्या वीजदरानुसार दरमहा सुमारे ५५० रुपयांची बचत होऊ शकेल. तसेच या यंत्रणेला लावण्यात आलेल्या नेटमिटरिंगद्वारे वर्षाअखेर शिल्लक वीज प्रति युनिट प्रमाणे महावितरणकडून विकत घेतली जाईल. त्याचाही आर्थिक फायदा संबंधीत घरगुती ग्राहकांना होणार आहे. सोबतच सौर यंत्रणा उभारणीच्या खर्चाची साधारणतः ३ ते ५ वर्षात परतफेड होणार आहे. दरमहा वीजबिलातील आर्थिक बचत तसेच पर्यावरणस्नेही ग्राहक म्हणून कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी महावितरणच्या घरगुती वर्गवारीतील वीजग्राहकांनी रुफटॉप सौर ऊर्जा योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन पर्यावरण रक्षणासाठी सहभागी होऊ शकतात. तसेच आपल्या वीजबिलात ही बचत करू शकणार, असे आवाहन महावितरणच्या भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.धनंजय औढेंकर यांनी केले आहे.

## संक्षिप्त...

### तळा पत्रकारांनी पोलिसांचा केला सत्कार

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील ग्रामीण भागात महिलांची छेडछाड करून लुटमार करणाऱ्या चोराला तळा पोलिसांनी फिल्मी स्टाईलने पकडून ग्रामीण भागातील पंचक्रोशीतील ग्रामस्थांची व तळा तालुक्यातील नागरिकांची दहशत निघून गेली आहे पोलिसांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल तळा पत्रकार च्या वतीने आज तळा पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे सह.पो.निरीक्षक शिवराज खराडे संजय शिंदे व सुरेश पवार यांचा व त्याला अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला तालुक्यातील चोरवली तारणे कासेखोल पन्हेळी या भागात या चोरट्याने महीलांची छेडछाड काढून दागिने चोरी केली होती गेले सहा महिने तळा शहरासह ग्रामीण भागात मोठी दहशत पसरली होती महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. फिर्यादी ने वर्णनावरून तळा पोलिसांनी सापळा रचून अज्ञात चोरट्याला पकडण्यात आले होते.पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे यांनी एक पथक तयार केले होते. त्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवराज खराडे पोलीस हवालदार सुरेश पवार व संजय शिंदे यांची निवड केली होती त्यानुसार यांनी या चोरट्याला यशस्वी कामगिरी करून पकडल्यामुळे तळापत्रकारा तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी उपाध्यक्ष किशोर पितळे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला व सहकारी रविंद्र सर्णेकर, राकेश सानप विष्णू तिडके, जगताप, पाटील, सोनाली नरवाडे मॅडम पोलीस कर्मचारी यांना गुलाबपुष्प देऊन सन्मान केला महाराष्ट्र पोलिसांचे सद्रक्षणाय खलनिग्रहणाय'' ब्रीदवाक्याची प्रचिती आली.यांनी केलेल्या उल्लेखनीयकामगिरीचा सन्मान करणे हे सामाजिकबांधिलकीसमजून तळापत्रकारांनी त्यांचा सन्मान केला यावेळी सचिव डी टी आंबेगाव सदस्य नजीर पठाण संध्या पिंगळे श्रीकांत नांदगावकर सुरेंद्र शेलार, संजय रिकामे पुरूषोत्तम मुळे, विराज टीळक उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री.निलेश ज्ञानदेव दडस हे खालील वर्णनाची मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचा व्यवहार सदर मिळकतीचे मालक श्री.विकास शिवाजी ननावरे यांच्यासोबत चालू आहे. या व्यवहाराची जाहीर नोटीस देण्याबाबत विद्यमान मालकांनी संमती दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**केएल–५/२७/१०, इमारत क्र.–केएल–५/२७, दुसरा मजला, सदनिका क्र.१०, प्लॉट क्र.३ ई/०५, सेक्टर–३ ई, कळंबोली कॉलनी, नवी मुंबई, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, पिन–४१०२१८**

सदर मिळकत ही २०/०५/१९९९ रोजी दस्तऐवज क्र.१६६४/१९९९ अन्वये जागामालक श्री.विकास शिवाजी ननावरे यांनी श्री.अल्वीन डिसोझा यांच्याकडून खरेदी केलेली होती. सदर दस्तामध्ये काही ठिकाणी नजरचुकीने इमारत क्र.२७ ऐवजी इमारत क्र.२८ असे वर्णन झालेले आहे. परंतु सदर मिळकतीचे खरे वर्णन इमारत क्र.२७ असेच आहे. तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तीने सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासोबत आपली हरकत खाली सही करणार यांचयाकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आम्ही सदर व्यवहार पूर्ण करू व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

दि.१७/१०/२०२२

सही/–

**ॲड.उमेश पंडित राठोड**

**मुंबई–हायकोर्ट**

**ऑफिस : एलआयजी–२, सेक्टर १, डी–९२, कळंबोली, नवी मुंबई–४१०२१८**

**मो.नं.९०२२१६५००८**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेले असेसमेंट मधील मिळकत श्री.पांडुरंग शांताराम माळी व श्री.उत्तम शांताराम माळी यांचे मालकी हक्काची ताबेकब्जातील घर मिळकतीचे असेसमेंट असून सदरची घर मिळकत असून सदरची घर मिळकत आमचे अशिल श्री.तेजस मनजी पटेल यांनी विकसनासाठी घेतली आहे. तरी सदर घरमिळकतीचा असेसमेंटचा विकसन करारनामा करणार असल्याने या कारणासाठी जाहीर नोटीस प्रसिद्ध आहोत.

| अ.क्र. | घर मालकाचे नाव | घर क्रमांक | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | श्री.पांडुरंग शांताराम माळी<br>श्री.उत्तम शांताराम माळी | २४५/४ | ३७.१७ |

प्राप्त परिस्थिती वरील परिशिष्टात नमूद ॲसेसमेंटमध्ये वर्णन केलेली घरमिळकत वा कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचे व्यवहार करार, मदार, वहिवाट, ताबाकब्जा, मृत्यूपत्रांकित दान, बक्षिस, फरोक्त, भाडेपट्टा, चार्ज, लिन, वगैरे इतर हक्क हितसंबंध असल्यास सबळ पुराव्याचे कागदपत्रे हरकती १५ दिवसांचे मुदतीत लेखी हरकती कळवावेत.

वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध निर्विधात आहे असे गृहीत धरुन विकसन करारनामा करण्यात येईल मागावून येणारी हरकत, तक्रार वगैरे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही असे आमचे अशिलांमार्फत सुचविण्यात येत आहे, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल

दि.१७/१०/२०२२

सही/–

**ॲड.विकास अशोक बडे**

**बी.ए.एल.एल.बी.**

**वकील उच्च न्यायालय**

**ऑफिस : गाळा नं.१, समर्थ शिवराम मार्केट, मेन बाजार पेठ, मोहोपाडा, ता.खालापूर, जि.रायगड ४१०२२२**

**मो.नं.९६६५१९७२३१**

**८८८८१३३४०२**


# मिसेस रायगड स्पर्धेत पुजा भागवत विजेती

**दै.रायगड नगरी । पेण**

स्वररंग पेण फेस्टिवल मध्ये झालेल्या मिसेस रायगड स्पर्धेत कोपरी ठाणेच्या पूजा भागवत यांनी मिसेस रायगडचे अंतिम विजेते पद पटकावले. तर नागोठणेच्या स्मिता कुथे यांनी उपविजेते व अलिबागच्या साक्षी देवरुखकर यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक जिंकले.

तसेच या स्पर्धेतील बेस्ट कॉस्टयूमच निधी मोरे (मीरा रोड,मुंबई), बेस्ट स्माईल सौम्या भगत (अलिबाग), बेस्ट पर्सनॅलिटी प्रीती पाटील (मीरा रोड, मुंबई), बेस्ट फोटोजनिक कांचन म्हात्रे (पेण), बेस्ट हेअर ननीत भोसले (अलिबाग), बेस्ट कॅटवॉक सुरभी कार्ले कर (रसायनी) या स्पर्धकांनी पारितोषिके पटकाविले. पेण फेस्टिवल म्हणजे पेणची शान असून ग्रामीण भागातील जत्रेतून जसा आनंद मिळतो तसा आनंद या पेण फेस्टिवल मधून मिळत असून छोट्या व्यावसायिकांना तसेच कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळून त्यांच्या कलागुणांना वाव मिळत असतो. मिसेस रायगड, मिस्टर रायगड, मिस रायगड, रॅम्प ऑक, फॅशन शोच्या माध्यमातून अनेकांचे भवितव्य घडले आहे. १४ वर्ष पेण फेस्टिवलचे यशस्वी आयोजन करून सातत्य राखले आसल्याचे वैकुंठ पाटील यांनी या वेळी सांगितले.



# उरण शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे पथसंचलन



**दै.रायगड नगरी । उरण**

हिंदूची जगातील सर्वात मोठी संघटना म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सर्वांना सुपरिचित आहे.सर्व जाती धर्माचे व्यक्ती आज संघात कार्यरत आहेत. संघाच्या एकूण महत्वाच्या कार्यक्रमा पैकी पथसंचलन हा एक महत्वाचा कार्यक्रम आहे.राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे दरवर्षी पथसंचलनाचे आयोजन संपूर्ण देशात करण्यात येते.रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातही दरवर्षी पथ संचलनाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी उरण शहरात काल सकाळी ९ वा. पथसंचलन काढण्यात आले.सर्वप्रथम सर्व स्वयंसेवक उरण शहरातील देऊळवाडी येथील संघस्थान येथे एकत्र जमले.

एकत्र जमल्यानंतर संघाची प्रार्थना झाली. त्यानंतर देऊळवाडी येथून पथसंचलनाची सुरवात झाली.हे पथसंचलन देउळवाडी, गणपती चौक – राजपाल नाका– चारफाटा–बालई– बाझारपेठ – राजपाल नाका स्वामी विवेकानंद चौक, एन आय हायस्कूल,मार्गे परत मूळ स्थानी देऊळवाडी या मार्गाने पथसंचलन झाले. यावेळी ५४ स्वयंसेवकांनी पूर्ण गणवेश घालून यात सहभाग घेतला व इतर १९ मान्यवर असे एकूण ७३ स्वयंसेवक या पथसंचलनात सहभागी झाले होते. सदर पंथसंचलन शांततेत व मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ उरण तालुका कार्यवाह– दर्शन पाटील,सह–कार्यवाह– भरत पाटील,मुख्यशिक्षक– गोपाल प्रजापती,जिल्हा संपर्क–श्रीपाद कातरणे,जिल्हा कार्यालय प्रमुख– स्वप्निल रावते,जिल्हा महाविद्यालयीन प्रमुख– पुष्कर सहस्त्रबुद्धे,व्यवस्था प्रमुख–पुरुषोत्तम सेवक, भारतीय जनता पार्टीचे उरण तालुकाध्यक्ष रवीशेठ भोईर, नगरसेवक राजू ठाकूर,उरण पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक (गुन्हे) सुहास चव्हाण, सहा. पोलीस निरीक्षक अनिरुद्ध गिजे, पोलिस कर्मचारी–युवराज जाधव उपस्थित होते.

# डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथे मनोहर केशव रणदिवे ग्रंथालय व IQAC यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२२ रोजी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री पुरुषोत्तम मुळे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त श्री मारुती शिर्के गुरुजी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा.मनोज वाढवळ यांनी केले. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम साजरे करण्या मागील भूमिका व ग्रंथालय विभाग राबवत असलेल्या उपक्रमांची मांडणी केली. या वेळी प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.भगवान लोखंडे यांनी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्रा तून विद्यार्थी, शिक्षक, नागरिक व एक संवेदनशील माणूस म्हणून किमान कोणत्या बाबी आपण ग्रहण कराव्यात याची मांडणी केली.

प्रतिकूल परिस्थितीतही कशी उभारी घ्यावी, यश संपादन करावे, ज्ञान हीच खरी शक्ती आहे जी मानवी जीवन चरित्र अधिक प्रगल्भ बनवू शकते, धर्माच्या भिंती ओलांडून धर्मनिरपेक्ष समृद्ध जीवन कसे जगावे, न्युनगंड बाजूला करून विकसित जीवनाची, विकसित समाजाची स्वप्न कशी बघावीत,जगावीत व जागवावीत, सामाजिक बांधिलकी, संवेदनशीलता, राष्ट्र भक्ती कशी आत्मसात करावी याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जीवन चरित्र डॉ भगवान लोखंडे यांनी उपस्थितां समोर उभे केले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना संस्थेचे विश्वस्त श्री मारुती शिर्के गुरुजी यांनी उपस्थित विद्यार्थी वर्गाने डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्रातून प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. पुरुषोत्तम मुळे यांनी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे मोठेपण त्यांच्या शिक्षण कार्य व पदव्यांमधून कसे व्यक्त होते हे विषद केले. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणतात तुमच्या कडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयांचे पुस्तक घ्या. कारण भाकरी तुम्हाला जगवेल व पुस्तक तुम्हाला जगायचे कसे ते शिकवेल. मित्रांनो ग्रंथ संपदा व वाचन संस्कृती जगवायची जबाबदारी तुम्हा युवकांसमोर आहे हे लक्षात ठेवा, असे सांगितले. या कार्यक्रमाचे निवेदन डॉ. तृप्ती थोरात यांनी केले तर आभार डॉ बेग यांनी मानले.





## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : तुर्भे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली शेतजमीन मिळकत या मिळकतीसमोर लिहिलेल्या कब्जेदारांकडून आमचे अशिल हे सदरची मिळकत कायम खरेदी घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : तुर्भे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदारांचे नाव | गट क्रं. उपविभाग क्रं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| १) श्रीमती.कुसूम पांडुरंग म्हात्रे<br>२) श्री.पांडुरंग शामा म्हात्रे<br>३) श्री.विशाल पांडुरंग म्हात्रे | ५१/२ | ०–१२–०० | १.३१ |

सदर मिळकत निर्वेध असल्याची वर नमूद विद्यमान मालकांनी दिली आहे. तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीस, दावा वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क–हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल

दि.१७/१०/२०२२

सही/–

**एन.ए.शेख ॲण्ड असोशिएट्स**

**वकील व नोटरी**

**शॉप नं.२४, अमन सोसायटी, सेक्टर ५ ई, कळंबोली, नवी मुंबई**

**मो.नं.९९२०९९६९०९**



मा.श्री.गुन्नाल साहेब

**वकील : ॲड.श्रीकांत म्हात्रे**

**ॲड.धर्मनाथ नामा गोंधळी**

**ॲड.शोभना धर्मनाथ गोंधळी**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१४७३/२०२२

श्रीमती.पुनम संजय सिंग — अर्जदार

विरुद्ध

श्रीमती.करुना चंद्रभान सिंग — सामनेवाली

तमाम जनतेस कळविण्यात येते अर्जदार यांचे पती कै.संजय चंद्रभान सिंग ह्या दि.२६/०७/२०२२ रोजी मृत्यू पावले आहेत. त्यांची मौजे : कळंबोली येथील खालील वर्णनाची मिळकत तिचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क. | नाव | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र/किंमत |
|---|---|---|---|
| १ | कै.संजय चंद्रभान सिंग | निळकंठ हाईटस, प्लॉट नं.४३ ए आणि ४४ ए, फ्लॅट नं.११०२, ११ वा मजला, सेक्टर १६, कळंबोली नवी मुंबई | ९९५ चौ.मी व रु.६१,००,००० |
| २ | कै.संजय चंद्रभान सिंग | इंडिया बुल पार्क को. ऑप.हौ.सोसायटी कोन व्हीलेज RUSE SC प्लॉट नं.२६०५, २६ वा मजला, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | १७०० चौ.मी व रु.६९,७५,००० |

वरील मिळकतीचे कोणतेही साठेकरार विक्रीकरार, फरोक्त खत, गहाण खत, बक्षिसपत्र असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी अगर तोंडी हरकत घ्यावयाची आहे. वरील मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांना वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

पनवेल

दि.१७/१०/०२२

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी श्री.निवृत्ती लडू म्हात्रे, रा.मु.पो.धाकटी जुई, ता.उरण, जि.रायगड यांच्या सामाईक मालकी वहिवाटीच्या मौजे : विंधणे, ता.उरण येथील खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेल्या जमीन मिळकती आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

**मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड येथील**

| अ क्र | गावाचे नाव | भूमापन क्र | हि. नं. | क्षेत्र | | | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जिरायत हे.आर.पॉ. | पोटखराबा हे.आर.पॉ. | एकूण हे.आर.पॉ. | |
| १ | विंधणे | ३०० | १ | ०–८३–४० | ०–०२–५० | ०–८५–९० | ८.८१ |

सदर संपूर्ण मिळकतीपैकी श्री.निवृत्ती लडू म्हात्रे यांच्या हिश्श्याची ० हे–०८ आर.०० पॉ. म्हणजेच ८ गुंठे जमीन सदर जाहीर नोटीशीचा विषय आहे.

वर नमूद केली मिळकत म्हणजेच मौजे : विंधणे येथील सर्व्हे क्र.३०८/१/ब, एकूण क्षेत्र–० हे–९०आर.६० पॉ. सदर संपूर्ण मिळकतीपैकी श्री.निवत्ती लडू म्हात्रे यांच्या हिश्श्याची ०हे–०८आर.०० पॉ. म्हणजेच ८ गुंठे जमीन मिळकत व सदर मिळकतींमधील सर्व मालकी हक्कासंहीत सदर मिळकतींचे मालक श्री.निवृत्ती लडू म्हात्रे यांच्याकडून आमचे अशिल १) श्री.अनीमिश बसवराज पावटे, २) श्री.गणेश प्रजापती आणि ३) श्री.रामदास पवार, यांनी कायमस्वरुपी खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतींमध्ये अगर त्यांचे कोणत्याही भागांवर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण–दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क–हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत आमच्या वरीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्री.निवृत्ती लडू म्हात्रे यांचे मालकी हक्क–हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकती खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणाही, हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल

दि.१७/१०/२०२२

सही/–

**श्री.निकेश गोपीनाथ पाटील, ॲडव्होकेट**

**पत्ता : मु.पो.तोंडरे, तळोजा एमआयडीसी, ता.पनवेल, जि.रायगड**

# बनावट इंधन पुरवठा बिल सादर करून केली ६ लाख ८३ हजार रुपयांची फसवणूक

## पोलिसासह, पेट्रोलपंप मालक, मॅनेजरवर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बनावट इंधन पुरवठा बिल सादर करून महाराष्ट्र शासनाची ६ लाख ८३ हजार १४ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस शिपायासह पेट्रोल पंपाचे मालक, मॅनेजर, सुपरवायझर, पंपावरील कामगार अशा एकूण ८ जणांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात फसवणुकीसह अन्य कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवी मुंबई आयुक्तालयातील शासकीय वाहनांना इंडियन ऑइल कंपनीचे इंधन वितरक आशिष सर्विस, खारघर हे उधारीवर इंधन देतात. मोटार परिवहन विभाग, कळंबोली येथील पोलीस उपनिरीक्षक रमेश गांगुर्डे यांना मोटर परिवहन विभागातील इंधन विभाग अंतर्गत वाहनांच्या इंधनावर खर्च झालेल्या रजिस्टरमध्ये नोंदणी भरण्याचे काम करत असताना ऑगस्ट महिन्यात आशिष सर्विस, खारघर या पेट्रोल पंपाकडून इंधन बिलाच्या बनावट पावत्या मिळून आल्या. त्या बिलांचा लेखी रिपोर्ट तयार करून पोलीस निरीक्षक, मो. प. विभाग यांना सादर केला. यावेळी प्राथमिक चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले. चौकशी अंती नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनावर कार्यरत असलेले चालक पोलीस शिपाई संतोष गोपाळ म्हात्रे यांनी ठाणे, खोपट येथे जाऊन आशिष सर्विस, पेट्रोलपंप खारघर यांच्या नावाची खराब झालेली पावती दाखवली व त्यांच्याकडून दोन पावती पुस्तक बनवले. पोशि संतोष म्हात्रे यांनी बनावट इंधन पावती पुस्तकावर पोलीस निरीक्षक, मो.प. विभाग हा शिक्का मारला. संतोष म्हात्रे हे वाहनाची चावी घेऊन कोणते वाहन बंद आहे ते पाहून त्या वाहनाचा क्रमांक बनावट इंधन पावतीवर लिहत होते. व कोणते वाहन किती किलोमीटर चालले आहे याबाबतच्या नोंदी पाहून ते बनावट पावतीवर वाहन क्रमांक व किलोमीटर लिहत होते.

आशिष सर्विस पेट्रोल पंपवर काम करणारे कर्मचारी आशिष हौशीला तिवारी, गोविंद छेडू चव्हाण उर्फ पटेल, विनायक जनार्दन म्हात्रे, भरत धोंडीराम सकपाळ यांनी व पोशि संतोष म्हात्रे यांनी संगनमत करून चौघांपैकी जे कामावर हजर असतील त्यांच्याकडे पावती जमा करून ते त्यांच्या हिश्याचे एक लिटर इंधनाचे २० ते २५ टक्के प्रमाणे पैसे कापून बाकीचे पैसे संतोष म्हात्रे यांना देत असत. त्यांनी १ फेब्रुवारी २०२२ ते १५ जुलै २०२२ पर्यंतच्या कालावधीत ७ हजार ७४ लिटर इंधनाच्या बनावट पावत्या व त्याची बिले दिली आहेत. त्यानुसार शासनाची सहा लाख ८३ हजार १४ रुपयांची फसवणूक केली. तसेच पंपाचे मालक काशिनाथ नारायण बहिरम, मॅनेजर राजेंद्र अलीम चंदाणी व सुपरवायझर राजेश रामलाल प्रजापती यांनी २०२१ मध्ये पावत्यांची बिले सादर केली. ते पैसे त्यांच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. तरीसुद्धा त्यांनी एक फेब्रुवारी ते १५ जुलैपर्यंतच्या कालावधीत बनावट इंधन पावतीचे एकूण सात हजार ७४ लिटर इंधनाचे ६ लाख ८३ हजार १४ रुपयांची बनावट बिले तयार करून नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयाकडे मंजुरी करता पाठवली. त्यापैकी दोन लाख ८५ हजार ७२० रुपयांची बिले मंजूर होऊन पेट्रोल पंपाच्या बँक खात्यात रक्कम जमा झाली आहे. अशा प्रकारे पोलीस शिपाई संतोष म्हात्रे यांच्यासह पेट्रोल पंपाचे कामगार, मालक, मॅनेजर व सुपरवायझर यांनी शासनाची फसवणूक केली. त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# संक्षिप्त...

## बबनबुवा मढवी यांचे सुश्राव्य संगीत भजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील उमरोली येथील बबनबुवा मढवी संगीत भजन सेवेद्वारे सर्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत आहेत. त्यांची ही सेवा वर्षानुवर्षे सुरू आहे.

पनवेल येथील हनुमान मंदिरात देखील दर शनिवारी बबनबुवांची भजन सेवा अनेक वर्षे सुरू आहे. त्यांच्या या सेवेबद्दल त्यांचे सर्व स्तरावर कौतुक होत आहे.



## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार करणाऱ्या आरोपीला अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२६ वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या आरोपीला खांदेश्वर पोलिसांनी सुकापुर येथून अटक केली आहे. अकबर अब्दुल रहमान शेख (वय २६, रा. कच्छी मोहल्ला, पनवेल) असे आरोपीचे नाव आहे. त्याला न्यायालयात हजर केले असता १९ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. करंजाडे येथील २६ वर्षीय पीडित तरुणीला आरोपी अकबर अब्दुल रहमान शेख याने लग्नाचे आमिष दाखवले. व २०१९ ते २०२२ पर्यंत करंजाडे, तळोजा, बालाजी सिंफनी येथे नेऊन संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर तिच्याकडून ५२ हजार ६०० रुपये घेतले. व दुसऱ्या मुली सोबत लग्न केले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित तरुणीने खांदेश्वर पोलीस ठाण्यात आरोपी अकबर अब्दुल रहमान शेखच्या विरोधात बलात्कार व फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वपोनि सुभाष कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शांतिभूषण कामत, पोलीस हवालदार नवनाथ नरळे यांनी आरोपीला सुकापुर येथून अटक केली.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# 'सर्जनशीलतेचा नवाविष्कार' दिवाळी अंक प्रकाशन सोहळा व निमंत्रितांच्या कविसंमेलन उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जाई फाउंडेशन महा ४९/२०२१ द्वारा संचालित शब्दवेल साहित्य मंच मुंबई द्वारा आयोजित 'सर्जनशीलतेचा नवाविष्कार शब्दवेल दिवाळी अंक २०२२ दिवाळी अंक प्रकाशन सोहळा व निमंत्रितांचे कविसंमेलनाचे पृथ्वी हॉल, नविन पनवेल येथे उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून एल. बी.पाटील (रायगड भुषण) तर उद्घाटक म्हणून प्रदीप म्हापसेकर (सुप्रसिद्ध लेखक व चित्रकार), कार्याध्यक्ष डॉ.वर्षा रणदिवे (मुख्य संपादक सर्जनशीलतेचा नवाविष्कार) प्रमुख उपस्थिती अधिकृत सल्लागार अंजली ढमाळ (राज्यकर उपायुक्त) तर मार्गदर्शक म्हणून प्रतिभा सराफ (ज्येष्ठ साहित्यिक) पुष्पराज गावंडे (युवा कादंबरीकार तथा सदस्य महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ) तर प्रमुख अतिथी म्हणून गणेश कोळी (जिल्हाध्यक्ष कोमसाप रायगड भोळे सर यांची उपस्थिती लाभली. प्रकाशन सोहळ्यानंतर दोन सत्रामध्ये निमंत्रितांच्या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते पहिल्या कविसंमेलनाच्या पहिल्या सत्राचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक विजय बिंदोड, तर प्रमुख अतिथी म्हणून जितेंद्र लाड, माणिकराव गोडसे व जयश्री चौधरी उपस्थित होत्या. दुपारी १:३० ते २:०० या वेळेत सहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते तद्नंतर दुपारच्या सत्रात मंदाकिनी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले तर प्रमुख अतिथी म्हणून अशोक उघडे, संजिवनी राजगुरू, राजेंद्र राठोड उपस्थित होते. राज्यभरातुन जवळपास सत्तर कवी या कविसंमेलनासाठी निमंत्रित करण्यात आलेले होते. एकापेक्षा एक दर्जेदार कवींनी रचना सादर करून काव्यसंमेलन उत्तरोत्तर रंगत नेले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शब्दवेल साहित्य मंचचे



अध्यक्ष प्रविण बोपुलकर, सचिव अश्विनी अतकरे, उपाध्यक्षा रंजना कराळे, उपाध्यक्षा शितल राऊत, व्यवस्थापक नरेंद्र लोणकर, प्रमुख कार्यवाह प्रविण सोनोने, मुख्य कार्यकारिणी सदस्य रामदासजी गायधने, आबासाहेब कडू व रायगड जिल्हा कार्यकारिणीतर्फे शब्दवेल रायगड जिल्हाध्यक्ष देवेंद्र इंगळकर, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष विलास पुंडले, उपाध्यक्षा योगिनी वैदू यांनी परिश्रम घेतले शेवटी रामदासजी गायधने यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# फातिमा मातेची ८७ वी तीर्थयात्रा उत्साहात, हजारो भाविकांनी घेतले दर्शन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मधील ख्रिश्चन धर्मियांचे प्रार्थना मंदिर ( चर्च ) गेल्या काही दशकांपासून फातिमा माऊलीच्या नावाने प्रसिद्ध आहे. प्रत्येक वर्षी १३ ऑक्टोबर किंवा त्या नंतर येणाऱ्या रविवारी या मातेची तीर्थयात्रा असते. गेली दोन वर्षे कोविडच्या संकटामुळे साध्या पद्धतीने तीर्थयात्रेचा उत्सव साजरा करण्यात आला होता. यंदा ८७ वी फातिमा मातेची तीर्थयात्रा उत्साहात संपन्न झाली. देश – विदेशांतून आलेल्या भाविकांनी मातेचे दर्शन घेतले. तसेच अन्य धर्मियांनी देखील उपस्थिती दर्शवून दर्शन घेतले.

कर्जत रेल्वे स्थानका नजीक असलेल्या चर्चच्या परिसरात अक्षरशः जत्रेचे स्वरूप आले होते. सकाळी फातिमा मातेच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी फ बिशप जॉन रॉड्रिक्स, फादर जोसेफ डिमेलो, फादर अंथोनी साना, फादर ऑलवीन मिस्किटा, फादर फ्रान्सिस बाप्टिस, फादर डेनिस डिसोझा, फादर ज्यो आदी उपस्थित होते. चर्च चे प्रमुख फादर लुईस कजार यांच्या उपस्थितीत फादर डेनिस गोंन्साल्विस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. बँड पथकाच्या तालावर फातिमा मातेची मिरवणूक काढण्यात आली. या वेळी ख्रिश्चन धर्मियांबरोबरच अन्य धर्मीय भाविकांनीही जागोजागी मातेच्या पुतळ्यावर फुलांचा वर्षाव केला. त्यानंतर व्यासपीठावर दीप प्रज्वलित करून एका विशेष समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. फादर लुईस कजार यांनी उपस्थितांचे



स्वागत करून प्रास्ताविकात चर्च ची महती सांगितली. त्यानंतर प्रमुख व्याख्याते बिशप जॉन रॉड्रिक्स यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना 'मारिया सर्वसामान्य व्यक्ती होती, देवाने निवडलेली व्यक्ती होती. करुणायुक्त हृदय, धैर्यवान, वचनबद्ध व्यक्ती होती तिच्या जीवनाचे महत्व आपण जाणून घेतल्यास आपल्या मध्ये नक्की आध्यत्मिक परिवर्तन शक्य आहे.' असे स्पष्ट केले. दिवसभरात अन्य समाजाच्या भाविकांनी सुद्धा फातिमा मातेचे मनोभावे दर्शन घेतले.

# मंगळवारी पनवेलमध्ये बाल नाट्य स्पर्धेची कार्यशाळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दोन वर्षाच्या कठीण काळानंतर आता शाळा नव्या उत्साहात सुरु झाल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या उत्साहाला आणि ऊर्जेला एक नवी दिशा देण्याचा संकल्प श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि अखिल भारतीय मराठी नाटय परिषद पनवेल यांनी केलेला आहे. त्या अनुषंगाने मंगळवार दिनांक १८ ऑक्टोबर रोजी मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात सायंकाळी ०४ वाजता 'बाल नाट्य स्पर्धे ची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. आणि या कार्यशाळेत बाल नाट्यांचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक राजू तुलालवार हे मार्गदर्शन करणार आहेत.

अखिल भारतीय मराठी नाटय परिषद पनवेलचे शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मागील सोळा वर्ष या दोन्ही संस्था अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा ही अतिशय भव्य दिव्य स्वरुपात आयोजित करीत आहे. या स्पर्धे त अनेक होतकरु रंगकर्मींनी आपला ठसा उमटवून व्यावसायिक नाटय क्षेत्रात यशस्वी पदार्पण केलेले आहे. पनवेल उरण परिसर हा सांस्कृतिकदृष्ट्या समृध्द परिसर असून हा कलाकारांचा प्रदेश आहे. विद्यार्थ्यांमधील अभिनय कलेला प्रोत्साहन मिळावे, त्यांना रंगमंच उपलब्ध व्हावा त्याचबरोबर एक सृजनशील पिढी तयार व्हावी म्हणून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. प्रत्येक बालकात उपजतच एक नट दडलेला असतो. याचा अनुभव आपण रोज घेतच असतो. त्यामुळे बाल नाट्य निर्माण करणाऱ्या मार्गदर्शकांना त्यांच्या शंकांचे निरसन, आणि प्रोत्साहन देण्यासाठी परिषदेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांच्या संकल्पनेनुसार या सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यशाळेत जास्तीत जास्त इच्छुकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# माथेरानमध्ये युवा रुखी गुजराती समाजाचा शिंदे गटात जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये नगरपरिषदेच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले असून सध्यातरी शिवसेनेच्या शिंदे गटाचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह सक्रिय होऊन येथील प्रत्येक प्रभाग पिंजून काढण्यासाठी आणि त्या त्या प्रभागातील निष्ठेचे सदस्य निवडून त्यांचे पक्षप्रवेश करण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये युवा रुखी गुजराती समाजाचे अध्यक्ष अंबालाल वाघेला, उपाध्यक्ष अशोक वाघेला, किसन वाघेला, (सल्लागार) विष्णू वाघेला, (माजी अध्यक्ष) नारायण पुरबिया, मनोज वाघेला, धीरज वालेंद्र, हृषीकेश वाघेला, उदयसिंग वाघेला, प्रवीण वाघेला, अजय वाघेला, नेहा पुरबिया, गीता वाघेला, मोनिका पुरबिया, गीता पुरबिया, कविता वाघेला यांनी शिंदे गटाच्या बाळासाहेबांच्या शिवसेनेत पक्षप्रवेश केला. यावेळी चंद्रकांत चौधरी यांनी सर्वांचे स्वागत करून कोणत्याही प्रसंगी आम्ही आपल्या सोबत आहोत असे आश्वासन नवोदित प्रवेश कर्त्यांना दिले.

वाल्मिकी नगर भागातील युवा रुखी गुजराती समाजाने चंद्रकांत चौधरी यांच्या निस्वार्थी कार्यपद्धती वर खुश होऊन स्वेच्छेने शिवसेनेच्या शिंदे गटात दि.१६ रोजी जाहीररित्या पक्षप्रवेश केला आहे.यावेळी आयोजित करण्यात आलेल्या छोटेखानी कार्यक्रमात बोलताना माजी नगरसेवक प्रकाश सुतार यांनी स्पष्ट केले की, माथेरान मध्ये शिवसेनेची स्थापना झाल्यापासून आम्ही एकदिलाने पक्षाशी प्रामाणिक पणे काम करत आहोत. सात ते आठ वर्षांपूर्वी काहीजण केवळ सत्ता उपभोगता यावी म्हणून पक्षात आले होते त्यानी सत्तेचा लाभ घेतानाच पक्षात दुफळी केली होती. त्यामुळे त्यांचा कल पूर्वीपासून आलेल्या पक्षाकडे होता त्यामुळेच ते त्यांच्या समविचारी व्यक्तींच्या सोबत स्वगृही गेल्यासारखे म्हणावे लागेल. आपण सर्वांनी पक्षात प्रवेश केला असल्याने नक्कीच काही विघ्नसंतोषी, आणि मुख्यतः महत्वाकांक्षी लोकांची भयावह अवस्था झालेली असणार त्यामुळे सर्वांनी एकजुटीने बाळासाहेब ठाकरे यांच्या शिंदे गटाच्या शिवसेनेचे काम निर्भीड पणे करावे कुणाच्याही भूलथापांना बळी पडू नका अन्यथा ही राजकीय मंडळी तुमचा वेळेपुरता वापर करतील यासाठी सावध पवित्रा घेऊन पक्ष बळकट करण्यासाठी प्रयत्न करा. पुढील सातत्याने आपलीच येणार असल्याने आपल्या ज्या ज्या काही अडीअडचणी, समस्या असतील त्या दूर करण्यासाठी चंद्रकांत चौधरी नक्कीच पुढाकार घेतील असे प्रकाश सुतार यांनी आपल्या छोटेखानी भाषणात नमूद केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मयुरेश कदम यांनी केले तर आभार प्रदर्शन निखिल शिंदे यांनी केले.



# दादाजी भुसे यांच्या हस्ते जेएनपीए आणि एमबीपीए द्वारे आयोजित 'पंतप्रधान गति शक्ती मल्टीमोडल मेरीटाईम रिजनल समिट २०२२' चे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । उरण**

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए - JNPA), भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर, मुंबई बंदर प्राधिकरण (एमबीपीए – MbP) यांच्या संयुक्त विद्यमाने 'पंतप्रधान गति शक्ती मल्टीमोडल मेरीटाईम रिजनल समिट २०२२,' ही दोन दिवसीय परिषद केंद्रीय बंदरे, शिपिंग आणि जलमार्ग मंत्रालय, भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आयोजित करत आहे. भारताच्या माननीय पंतप्रधानांनी ऑक्टोबर २०२१ मध्ये सुरू केलेल्या मल्टीमॉडल कनेक्टिव्हिटीसाठी 'गती शक्ती– राष्ट्रीय मास्टर प्लॅन' या संकल्पनेबद्दल अधिक जागरूकता निर्माण करणे हा या मागचा उद्देश आहे.

दादाजी भुसे, मंत्री (बंदरे आणि खाण), महाराष्ट्र सरकार यांच्या हस्ते शिखर परिषदेचे उद्घाटन झाले. संजय सेठी, आयएएस, अध्यक्ष – जेएनपीए; उन्मेष शरद वाघ, आयआरएस, उपाध्यक्ष – जेएनपीए; राजीव जलोटा, आयएएस, अध्यक्ष – एमबीपीए , आदेश तितरमारे, आयएएस, उपाध्यक्ष – एमबीपीए आणि इतर आदरणीय मान्यवर उदघाटन समारंभात उपस्थित होते.



दादाजी भुसे, मंत्री (बंदरे आणि खाणकाम), महाराष्ट्र सरकार यांनी आपल्या भाषणात, पंतप्रधान गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनच्या पुढाकाराने भारताच्या बंदर क्षेत्राच्या विकासात कशी महत्त्वाची भूमिका बजावली आहे आणि महाराष्ट्रासाठी देखील फायदेशीर ठरले आहे, याबद्दल बोलताना म्हणाले, पंतप्रधान गती शक्ती योजना, एक पायाभूत सुविधा बदलणारी योजना, भारताला २०४० पर्यंत २० ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था करण्याचे स्वप्न पूर्ण साकारण्यास मदत करण्यासाठी सुरू करण्यात आली होती. सर्व संबंधित केंद्रीय मंत्रालये, विभाग आणि राज्य सरकारांमध्ये एकात्मिक पायाभूत सुविधा नियोजन आणि समक्रमित प्रकल्प अंमलबजावणीसाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. . 'पंतप्रधान गति शक्ती' योजनेमुळे राज्य रस्ते, बंदर आणि विमानतळ कनेक्टिव्हिटीचे केंद्र म्हणून उदयास येऊ शकतील आणि राज्यातील व्यापार आणि आर्थिक समृद्धी वाढेल. संजय सेठी, आयएएस, अध्यक्ष – जेएनपीए, आपल्या भाषणात म्हणाले, गती शक्ती संसाधनांची देवाणघेवाण करून आणि अधिक सामंजस्यपूर्ण इकोसिस्टम तयार करण्याच्या दिशेने समन्वय विकसित करून पायाभूत सुविधांच्या पाइपलाइनला अधिक शक्ती आणि गती देईल. जेएनपीएची मल्टी–मॉडल कनेक्टिव्हिटी पीएम गति शक्तीच्या धर्तीवर खूप मोठे योगदान देते कारण हे बंदर जागतिक आणि स्थानिक पातळीवर एक विस्तारित प्रवेशद्वार आहे ज्यामध्ये रेल्वे आणि रस्त्याने बंदराशी अखंड कनेक्टिव्हिटी आहे, अंतराळ भागात पोहोचणे सोपे करण्यात, व्यवसायांमध्ये लवचिकता आणि कार्यक्षमता निर्माण करून लोकं, वस्तू आणि सेवांची हालचाल सुरळीत करेल.

राजीव जलोटा, आयएएस, अध्यक्ष – एमबीपीए या प्रसंगी बोलताना म्हणाले, पंतप्रधान गति शक्ती सहा स्तंभांवर आधारित आहे– सर्वसमावेशकता, प्राधान्यक्रम, ऑप्टिमायझेशन, सिंक्रोनायझेशन, विश्लेषणात्मक आणि गतिमान. गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन पायाभूत सुविधा आणि आर्थिक मंत्रालयांसाठी एक वास्तविक वेळ निर्णय घेण्याचे साधन बनेल. यामुळे खर्चाची कार्यक्षमता आणि स्पर्धात्मकता येईल आणि त्यामुळे देशातील एकूण लॉजिस्टिक कार्यक्षमतेत सुधारणा होईल. या समिटमध्ये, विभागांमध्ये समन्वय निर्माण करणे: ब्रेकिंग द सायलोस, ऑप्टिमायझेशनसाठी तंत्रज्ञानाचा वापर – वेळ आणि खर्च कमी करणे, डेटा मॅनेजमेंट – एनालिटिक्स अँड युटिलायझेशन, गतीशक्तीचे कन्व्हर्जिंग 'अमृत काल' व्हिजन २०४७ आणि गतीशक्ती उपक्रमांचे परिणाम व आउटपुट यासारख्या विविध विषयांवर आयोजित पॅनल चर्चा आणि सत्रांमध्ये विविध भागधारकांचा सहभाग होता.

# सोहम फाऊंडेशनच्यावतीने 'बालविवाह मुक्त भारत अभियान'



**दै.रायगड नगरी । पनवेल**

बालविवाह मुक्त भारत अभियानाची सुरुवात पनवेल तालुक्यातील वडघर येथे सोहम फाऊंडेशनच्या माध्यमातून करण्यात आली. पनवेल आणि रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात सोहम फाऊंडेशनच्यावतीने जनजागृती अभियान राबविले जात आहे. नवी दिल्ली येथील चिल्ड्रन फाऊंडेशन आणि महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट, पेण यांच्या सहकार्याने रायगड जिल्हयात अभियान सुरु आहे. बालविवाह राज्यात कमी व्हावेत, यासाठी हे अभियान राबविले जात आहे.

बालविवाह ही प्रथाच चुकीची आहे. यामुळे लहानग्यांचे बालपण खुंटते. वाढत्या बालविवाहांना आळा घालण्यासाठी व बालविवाह विरोधात जनजागृती करण्यासाठी सोहम फाऊंडेशनच्यावतीने अध्यक्षा मंजिरी मुळे, सचिव ॲड. आश्लेषा मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्र संयोजक शितल म्हात्रे काम पाहत आहेत. या अभियानाला ग्रामीण भागातून मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून सोहम फाऊंडेशनच्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.